दिनांक 14/02/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्रं.172

विषय – स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत विटा शहरामध्ये टाकाऊ वस्तूपासून कलात्मक वस्तू तयार करुन बसविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी स्वच्छता निरिक्षक यांची दिनांक 05/02/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा शहराने मागील वर्षांमध्ये स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत शहरामध्ये टाकाऊ वस्तूपासून कलात्मक वस्तू तयार करुन बसविणे आवश्यक आहे. शहरामध्ये टाकाऊ वस्तूपासून कलात्मक वस्तू बसविलेस सौंर्दीकरणामध्ये भर पडणार आहे. त्याचा फायदा स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधराच्या कामात होणार आहे.

तरी स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत शहरामध्ये टाकाऊ वस्तूपासून कलात्मक वस्तू तयार करुन स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कम अंतर्गत बसविणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 14/02/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.173

विषय – विटा नगरपरिषदेच्या जुन्या घंटागाडीवर एल.ई.डी स्क्रीन बसविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी स्वच्छता निरीक्षक यांची दिनांक 10/02/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद क्षेत्रामध्ये विविध प्रकारची जनजागृती करणे, कर भरणाबाबत नागरीकांना आवाहन करणे तसेच इतर जनजागृती करणे कामी नगरपरिषदेकडे फिरते एल.ई.डी स्क्रीन नसलेने जनजागृती करणे अडचणीचे होत आहे. सध्या नगरपरिषदेकडे जुनी घंटागाडी असून सदर घंटागाडीवर एल.ई.डी स्क्रीन बसविलेस जनजागृती करणे सोईचे होईल.

तरी स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कम अंतर्गत विटा नगरपरिषदेच्या जुन्या घंटागाडीवर एल.ई.डी स्क्रीन बसविणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 14/02/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.174

विषय – कार्यालयातील विविध विभागातील कामकाजासाठी मनुष्यबळ पुरवठा करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी संगणक अभियंता यांची दिनांक 10/02/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.3415, दि.15/01/2025.

विटा नगरपरिषद ही “ब” वर्ग नगरपरिषद असून 2011 च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या 48,289 आहे. तसेच सध्याची लोकसंख्या अंदाजे 60,000 आहे. शहराचे एकूण क्षेत्रफळ 55.15 चौ.किमी एवढ्या मोठ्या प्रमाणात विस्तारलेले आहे. तालुक्यातील सर्व प्रशासकीय कार्यालये व न्यायालय शहरात असलेने तसेच शहर गलाई व्यवसायासाठी प्रसिद्ध असलेने शहराचा झपाट्याने विस्तार होत आहे. शहराच्या वाढत्या विस्तारामुळे विविध विकास कामे देखील मोठ्या प्रमाणात सुरु आहेत. तसेच वाढत्या लोकसंख्येमुळे विविध सेवांसाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांचे विनंती अर्ज/तक्रार अर्ज/निवेदने प्राप्त होतात.

नगरपरिषदेच्या आकृतीबंधानुसार मंजूर पदसंख्येपैकी बरीच पदे रिक्त असल्याने कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचेवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे. याचा परिणाम कार्यालयीन कामकाजावर पडत असून नागरिकांना विहित कालावधीत सेवा देण्यास विलंब होत आहे.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र.1 नुसार सर्व विभाग प्रमुख यांचे कडून त्यांचे विभागाकडील कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी व नागरिकांना विहित कालावधीत सेवा पुरविण्यासाठी त्यांचे विभागात कार्यरत असणारे कर्मचारी यांचे व्यतिरिक्त अधिक कर्मचारी (कंत्राटी) आवश्यक असल्यास त्यांची माहिती सादर करणेबाबत कळविणेत आले होते.

त्यानुसार विविध विभागप्रमुख यांनी त्यांचे विभागासाठी आवश्यक कर्मचारी (कंत्राटी) यांची संख्या कळवली आहे. तरी नगरपरिषदेतील विविध विभागांना आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा करणेकामी मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा